जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR- 39/2017
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 15/12/2017

<u>दिनांक 19.12.2017 रोजी आयोजीत करण्यात आलेली मनपा सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका</u>

## विषय क्रं.01

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-2017/प्र.क्र.68/नवि-24 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 09, नोव्हेंबर 2017 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं 84 दिनांक 20.09.2016 विखंडीत करण्यासाठी प्रथमत: निलंबीत करणे बाबत.

**<u>शासन निर्णय :-</u>** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने, श्री पुंडलीक गंगाधर मोरे, बडतर्फ लिपीक यांना सेवेत पुर्नस्थापित करण्याबाबत दिनांक 20.09.2016 रोजी पारित केलेला ठराव क्रं. 84 हा प्रशासकीय टिप्पणीच्या विरुध्द असून नियमबाह्य असल्यामळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451(1) अन्वये प्रथमतः निलंबित करण्यात येत आहे.

2. सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधितांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे.

**करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं 84 दिनांक 20.09.2016 विखंडीत करण्यासाठी शासनाने प्रथमताः निलंबीत केलेले असुन त्याची नोंद घेणे बाबत.**

## विषय क्रं.02

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-2017/प्र.क्र.02/नवि-24 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 09, नोव्हेंबर 2017 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं 115 दिनांक 30.11.2016 विखंडीत करण्यासाठी प्रथमत: निलंबीत करणे बाबत.

**<u>शासन निर्णय :-</u>** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा श्री डी.एन.बारडकर चौकीदार मनपा नांदेड यांना 29 महिने 05 दिवसांचा थकित पगार देण्या बाबत पारीत केलेला ठराव क्रं. 115 दिनांक 30.11.2016 हा प्रशासकिय टिप्पणीच्या विरुध्द आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451(1) नुसार विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबित करण्यात येत आहे.

सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधितांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे.

**करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं 115 दिनांक 30.11.2016 विखंडीत करण्यासाठी शासनाने प्रथमताः निलंबीत केलेले असुन त्याची नोंद घेणे बाबत.**

## विषय क्रं.03

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-2017/प्र.क्र.262/नवि-24 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 09, नोव्हेंबर 2017 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं 19 दिनांक 26.05.2017 विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबीत करणे बाबत.

**<u>शासन निर्णय :-</u>** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने श्री बालाजी साहेबराव देशमुख यांना महानगरपालिकेत तात्पुरत्या स्वरुपात रोजंदारीवर (मानधनावर) नौकरी देण्याबाबत दिनांक 26.05.2017 रोजी ठराव क्रं. 19 हा संयुक्तिक नसल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451(1) नुसार विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबित करण्यात येत आहे.

सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधितांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे.

**करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने 26.05.2017 रोजी पारीत केलेला ठराव क्रं 19 विखंडीत करण्यासाठी शासनाने प्रथमताः निलंबीत केलेले असुन त्याची नोंद घेणे बाबत.**

## विषय क्रं.04

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-2017/प्र.क्र.143/नवि-24 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 09, नोव्हेंबर 2017 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं 157 दिनांक 27.02.2017 विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबीत करणे बाबत.

**<u>शासन निर्णय :-</u>** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रं. 157 दिनांक 27.02.2017 नुसार श्री रविराज गंगाधार जोंधळे यांना डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत पारीत केलेला ठराव हा प्रशासकिय टिप्पणीच्या विरुध्द आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451(1) नुसार विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबित करण्यात येत आहे.

सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधितांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे.

**करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रं. 157 दिनांक 27.02.2017 विखंडीत करण्यासाठी शासनाने प्रथमताः निलंबीत केलेले असुन त्याची नोंद घेणे बाबत.**

## विषय क्रं.05

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-2017/प्र.क्र.141/नवि-24 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 09, नोव्हेंबर 2017 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं 143 दिनांक 28.02.2017 विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबीत करणे बाबत.

<u>शासन निर्णय :-</u> नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने श्री गहलोत रामेश्वर बेनिसिंह, जकात जवान यांना बडतर्फीच्या आदेशाविरुध्द अपिल केले असता संबंधीतांस बडतर्फीचे आदेश रद्द करुन पुर्ववत कामावर पुर्नस्थापित करण्या बाबतचा ठराव क्रं. 143 दिनांक 28.02.2017 नुसार पारीत केलेला ठराव हा प्रशासकिय टिप्पणीच्या विरुध्द आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451(1) नुसार विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबित करण्यात येत आहे.

सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधितांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांकापासून 30 दिवसाच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे.

**करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रं. 143 दिनांक 28.02.2017 विखंडीत करण्यासाठी शासनाने प्रथमताः निलंबीत केलेले असुन त्याची नोंद घेणे बाबत.**

## विषय क्रं.06

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-2017/प्र.क्र.96/नवि-24 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 09, नोव्हेंबर 2017 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं 30 दिनांक 27.08.2015 व ठराव क्रं. 143 दिनांक 27.02.2017 विखंडीत करण्यासाठी प्रथमतः निलंबीत करणे बाबत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेने ठराव क्रं. 143 दि. 27.02.2017 अन्वये मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 30 दिनांक 27.08.2015 हा ठराव विखंडीत न करता ठराव पारीत केलेला आहे मनपाकेच्या सर्व साधारण सभेने ठराव क्रं. 30 विखंडीत न करण्या बाबत खालील कारणे नमुद केलेली आहे.

मनपाकेच्या मालकीची कांही दुकाने ही 25 वर्षापुर्वीची तर कांही दुकाने 30 ते 40 वर्षापुर्वीची आहेत असे असतांनाही या दुकानांना रेडिरेकनर नुसार कर आकारणी केलेली आहे वास्तविक पाहता या दुकानांचे बांधकामासाठी झालेला कालावधी लक्षात घेऊन घसारा गृहीत धरण्यात आलेला नाही सदर दुकाने ही 25 ते 40 वर्षापुर्वीचे असुन रेडिरेकनर नुसार सध्याच्या भाडयाच्या रकमेत 100 ते 50 पटीने भाडेवाढ होत असल्यामुळे भाडेवाढीचा निर्णय अन्यायकारक आहे त्यामुळे मनपा सर्वसाधारण सभेने दिनांक 27.08.2015 रोजी पारीत केलेला ठराव क्रं. 30 विखंडीत करण्यात येऊ नये असा पारीत केला होता

<u>शासन निर्णय :-</u> नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रं. 30 दि. 27.08.2015 व ठराव क्रं. 143 दिनांक 27.02.2017 हा महानगरपालिकेस आर्थीकदृष्टया अहितकारक आहे त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451(3) नुसार सदर दोन्ही ठराव अंतिमतः विखंडीत करण्यात येत आहे.

**करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रं. 30 दि. 27.08.2015 व ठराव क्रं. 143 दिनांक 27.02.2017 हा विखंडीत करण्यासाठी शासनाने प्रथमताः निलंबीत केलेले असुन त्याची नोंद घेणे बाबत.**

## विषय क्र.07

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामे करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य, यांच्या नियमावलीनुसार B-1 (Percentage Rate) निविदा मागविण्यात येत होत्या.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रं. सीएटी-2017/प्रक्र.8/इमा-2/मंत्रालय मुंबई-32 दिनांक 12 एप्रिल 2017 तसेच त्यासोबतचे केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या SBD वर आधारीत B-2 (Item Rate) नुसार निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर निर्णयास्तव सादर.

## विषय क्र.08

नांदेड वाघाळा शहर महानरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 55 दिनांक 30 एप्रिल 2013 अन्वये नांदेड शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजनेमध्ये सेक्टर डी, मधील स.नं. मध्ये इपी 11(6) नुसार मध्यवर्ती इमारत (महसुल, सार्वजनिक निमसार्वजनिक वापरासाठी दर्शवलेले आहेत त्यापैकी 1.6 हेक्टर जागा नकाशात दर्शविल्याप्रमाणे नविन आ.क्र. **डी-37 मुस्लीम कब्रस्तानसाठी आरक्षीत करुन त्याचे समुचित प्राधिकरण नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका करणेसाठी मंजुर सुधारीत विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये किरकोळ फेरबदल करण्याची शिफारस करण्यात आली आहे.**

प्रस्तावित फेरबदलाची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र मध्ये इंग्रजी व मराठी भाषेत पृष्ठ क्रं. 43, 44 वर प्रसिध्द झाली असून स्थानिक वृत्तपत्र दै. सायं, दै. नांदेड डायरी मध्ये दिनांक 22.10.2016 रोजी व दै. उद्याचा मराठवाडा मध्ये दि. 22.10.2016 रोजी प्रसिध्द झालेली आहे.

वैयक्तीक बाधित मालमत्ताधारकांना पत्र क्रं. नरवि/2983 दिनांक 10.03.2017 च्या पत्राव्दारे वैयक्तीक नोटीस देवुन हरकती / सुचना / आक्षेप असल्यास कळविणे ताअले आहे. व दिनांक 15.03.2017 बुधवार रोजी वेळ दु. 3.00 वाजता, 05.04.2017 बुधवार रोजी वेळ दु. 3.00 वाजता व 26.04.2014 बुधवार रोज वेळ दु. 3.00 वाजता सुनावणी आयोजीत करण्यात आली त्यांचे म्हणणे एकुण घेण्यात आले आहे व फेरबदलाच्या अनुषंगाने मालमत्ताधारकांनी फेरबदलास आक्षेप असल्याचे लेखी तसेच सुनावणीच्या वेळी सांगितले आहे. त्यानुसार प्रस्तुत फेरबदल शासन स्तरावर मंजुर होणार असून सदर आरक्षणाची महानगरपालिकेस आवश्यकता असल्याने जागा आरक्षीत करणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तरी उक्त फेरबदलास मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये प्रस्ताव शासनास सादर करणेच्या मंजुरीसाठी नावाशमनपा नांदेडच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

## विषय क्र.09

नांदेड वाघाळा शहरमहनपा हद्दी मध्ये राहणा-या तृतीयपंथी यांना साईट क्रं. 34 येथे घरकुल देणेसाठी कमल फाऊंडेशन (NGO) नांदेड यांनी दिनांक 26.07.2017 च्या निवेदनाव्दारे मागणी केली आहे तसेच या बाबतीत कमल फाऊंडेशन यांचे सोबत मा. जिलधिकारी नांदेड यांचेकडे दिनांक 236.06.2017 रोजी बैठक झाली असुन त्यानुसार नांदेड शहरामध्ये राहणा-या तृतीयपंथीयांचे घरकुल मागणी अर्ज मागविण्याचे ठरव शासनाच्या मंजुरीने घरकुल देणेसाठी पुढील कार्यवाही करण्याचे ठरले. त्यानुसार मनपाकडून दिनांक 07.07.2017 रोजी स्थानिक वर्तमानपत्रामध्ये तृतीयपंथी यांनी विहीत नमुण्यामध्ये दिनांक 15.07.2017 पर्यंत घरकुल मागणी अर्ज सादर करण्याचे जाहीर प्रगटन प्रसिध्द केले होते. त्यानुसार दिनांक 14.07.2017 रोजी एकूण 23 तृतीयपंथी यांनी घरकुल मागणी अर्ज सादर केले आहेत.

सदर तृतीयपंथी यांनी साईट क्रं. 34 येथे घरकुल मागणी केली आहे बिएसयुपी योजनेतील शिल्लक असलेले घरकुल अर्जदारांना शासनाची मान्यता घेऊन बिएसयुपी योजनेचा लोकवाटा भरुन घरकुल देणे शक्य आहे.

करिता खालील 23 तृतीयपिंथी अर्जदाराना बिएसयुपी योजनेमध्ये बांधकाम करण्यात आलेली साईट क्रं. 34 येथील घरकुल वाटप करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | नांव | भागाचे नांव |
|---|---|---|
| 01 | शानुर बानु बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 02 | रश्मीता शानुर बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 03 | अर्चना शानुर बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 04 | शीला अर्चना बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 05 | जानु शानुर बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 06 | जया शानुर बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 07 | दिपा जया बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 08 | मुस्कान जया बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 09 | सनम जया बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 10 | वर्षा शानुर बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 11 | राणी वर्षा बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 12 | मोणिका वर्षा बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 13 | संध्या वर्षा बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 14 | बाली वर्षा बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 15 | मंजुळा वर्षा बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 16 | पुनम वर्षा बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 17 | गौरी शानुर बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 18 | अंजली गौरी बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 19 | कल्याणी गौरी बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 20 | दिव्या गौरी बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 21 | रुपा गौरी बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 22 | मनिषा गौरी बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |
| 23 | चाहत गौरी बकश | लालवाडी, शिवाजीनगर, मस्जीद मार्ग |

## विषय क्रं.10

नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम-2016 चे तरतुदीनुसार Door-to-Door Collection and Transportation of Municipal Solid Waste up to Disposal Site in Nanded Waghala City Municipal Corporation, Nanded या कामासाठी E-Tender Notice No. 7642/2017-2018, Date 31.08.2017 अन्वये हिन्दुस्थान टाईम्स, दै. लोकमत, दै. प्रजावाणी या सुप्रसिध्द वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द करुन ई-टेन्डरींग मार्फत ऑनलाईनव्दारे निविदा मागविण्यात आल्या असता, एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त झालेल्या निविदा, निविदा समितीसमोर ठेवुन दिनांक 09.11.2017 रोजी सर्व निविदांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. त्यापैकी (1) बेरोजगारांची क्षितीज नागरीक सेवा सहकारी संस्था मया. (BKNSSS), अमरावती आणि (2) माधव एन्टरप्रायझेस, अकलेश्वर (गुजरात) या दोन निविदा Not Eligible (अपात्र) ठरल्याने उक्त दोन कंपनीचे Financial Bid (दरपत्रक) उघडण्यात आले नाही. उर्वरीत Eligible (पात्र) तीन कंपनीचे दरपत्रक उघडले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| Sr.No. | Name of the Company | Per M. Tonne | Daily Wages rate for Sanitation Labour provided by the selected bidder per labour |
|---|---|---|---|
| 1 | R & B Infro Project Pvt. Ltd., Mumbai | Rs. 1,647/- | X + Rs. 97/- per day per labour |
| 2 | P. Gopinatha Reddy, Bangalore | Rs. 1,823/- | X + Rs. 81/- per day per labour |
| 3 | Swachatha Corporation Bangalore | Rs. 1,959/- | X + Rs. 92/- per day per labour |
| X is the minimum rate approved by the Government time to time according to minimum wages act. | | | |

निविदा समिती समोर उघडण्यात आलेल्या निविदांपैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी (L1) दरांची निविदा प्रती मे.टन रुपये 1,647/- व प्रति दिन प्रती मजुर X + रु. 97/- या प्रमाणे R & B Infro Project Pvt. Ltd., Mumbai यांची असल्याने संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचाचरण केले. संबंधीतांने वाटाघाटी अंती प्रती मे.टन रु. 1,631/- व प्रती दिन प्रती मजुर X + रुपये 80/- या प्रमाणे दर कमी करुन तशी लेखी समंती दिली आहे.

सुरवातीची 05 वर्ष व समाधानकारक काम केल्यास पुढील 02 वर्ष अशा 07 वर्षाच्या निविदा कालावधीचा विचार करता वाटाघाटी अंती कंत्राटदाराने कमी केलेल्या दरामुळे साधारणपणे सुमारे रुपये 1/- कोटी रुपयांची बचत घनकचरा उचलण्याच्या कामात व सुमारे रु. 2/- कोटी रुपयांची बचत 450 कामगारांच्या सेवा पुरविण्याच्या कामात (असे रुपये 3 कोटींची रुपयांची बचत) होणार आहे.

सबब R & B Infro Project Pvt. Ltd., Mumbai यांची वाटाघाटीनंतरची प्रती मे. टन रुपये 1,631/- व प्रती दिन प्रती मजुर X + रुपये 80/- ची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.45% कमी दराची असल्याने मंजुर करणेस प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येत आहे. तसेच प्रस्तावीत कामाची निविदा प्रथमतः 05 वर्षासाठी मंजुर करुन कंत्राटदाराचे काम समाधानकारक असल्यास स्थायी समितीच्या मान्यतेने आणखी 02 वर्षाची मुदतवाढ देण्याचे निविदा प्रस्तावास निविदा सुचनेतील अटी व शर्तीसह मान्यता देण्यास सादर. तसेच निविदा अटी शर्तीसह करारनामा करणेस मान्यता मिळणेस निविदा प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 35(अ) नुसार मान्यता होणेस विनंती आहे.

## विषय क्र.11

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम-2016 लागू केले असल्याने सदर नियमानुसार घनकचरा व्यवस्थापनाचे प्रॉसेसिंग प्रकल्प उभारण्यासाठीचे D.P.R. (सविस्तर प्रकल्प अहवाल) राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई यांचे पत्र क्रं. राअस/घनकचरा/709/17-18 दिनांक 07.08.2017 अन्वये औरंगाबाद विभागातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे घनकचरा व्यवस्थापनाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी Eco-Pro Rnvironmental Services, Indore या संस्थेची नेमणुक करण्यात आलेली आहे.

त्यानुसार संबंधीत संस्थेने नांदेड वाधाळा शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाचे सविस्तर प्रकल्प अहवालाचे प्रारुप तयार करुन सादर केले आहे. त्यानुसार मंजुरीसाठी प्रकल्प अहवाल सोबत सादर केला आहे. सदर प्रकल्पाच्या उभारणीसाठी लागणारा खर्च केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून कांही प्रमाणात अनुदान स्वरुपात प्राप्त होणार असून उर्वरीत रक्कम ही महानगरपालिकेकडून दयावयाची आहे.

करिता उक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता प्रदान करुन राज्य व केंद्र शासनाकडे निधी मागणी प्रस्ताव सादर करण्यास सर्वसाधारण सभेची मान्यता व्हावी तसेच प्रकल्पास शासन मान्यता मिळाल्यानुसार निविदा मागवून पढील कार्यवाही करणेस सर्वसाधारण सभेची मान्यतेस्तव सादर.

## विषय क्र.12

शासन राजपत्र अधिसुचना क्रमांक प्लॉस्टिक 2005/सिआर-38/टीसीबी दिनांक 03.03.2006 नुसार महाराष्ट्र प्लॉस्टिक पिशव्या (उत्पादन व वापर) नियम, 2006 प्रसिध्द करण्यात आलेले असुन त्यामधील नियम क्रमांक 08 नुसार संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये 50 मायक्रॉन आणि 8X12 इंच आकाराच्या किंवा त्यापेक्षा कमी जाडीच्या व कमी आकाराच्या मूळ कच्च्या मालापासून (वर्जिन) किंवा पुनचीक्रिकरण केलेल्या प्लॉस्टिक पिशव्यांची निर्मिती, संग्रह किंवा वापरावर निर्बंध घालण्यात आलेले आहेत.

प्लॉस्टिक पिशव्या या अविघटनशील असल्याने नष्ट पावत नाहित. त्यामुळे त्यांची विल्हेवाट लावणे घनकचरा व्यवस्थापनासाठी अडचणीचे ठरत आहे. प्लॉस्टिक पिशव्यांचे वापरामुळे प्रदुषण होऊन पर्यावरणाची होणारी हानी, मानवी व प्राण्यांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, पावसाळयामध्ये तुंबणारी गटारे, नाल्या मल:प्रवाह व त्याअनुषंगीक होणारी वित्तहानी या सर्व बाबी विचारात घेता नांदेड शहरामध्ये प्लॉस्टिक कॅरीबॅगच्या जाडीचे मोजमाप न घेता अश्या पिशव्या कितीही जाडीच्या असोत, अशा सर्व प्लॉस्टिक पिशव्यांच्या वापर बंद करणे आवश्यक आहे त्यास मनपा सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**विषय क्रं.13**

नांदेड शहर विकास योजना (सुधारीत) अंतर्गत मंजुर असलेला देगलुर नाका चौक ते माळ टेकडी 30 मी. रुंद रस्ता क्रं. 09 जेएनएनयुआरएम अंतर्गत रस्त्याचे विकास करणेसाठी मान्यता मिळालेली असुन निधी मंजुर आहे. परंतु या विकासासाठी लागणा-या खाजगी जमीनीच्या भुसंपादना करिता निधी मंजुर नसुन मनपा कडून जागा उपलब्ध करुन देणे आहे.

या रस्त्याचे विकासामध्ये बाधीत भुधारकांचे सम्मतीने टीडीआर/एफएसआय चा लाभ देणे सबबीवर सालसन 2011-12 या कालावधीत या रस्त्याचा विकास करण्यात आला आहे त्यावेळी भुसंपादन प्रस्ताव सादर न करताच परस्पर जेएनएनयुआरएम विभाग मार्फत ताबा पावती देवुन जागा ताब्यात घेतली आहे. त्यानंतर भुधारकांकडून मावेजाची मागणी होत असल्याने भुसंपादन प्रस्ताव तयार करुन संयुक्त मोजणी करण्यात आली. संयुक्त मोजणी अहवाला प्रमाणे या प्रकरणात जवळपास 176 भुधारकांची 23490 चौ.मी. जागा संपादनात येत आहे या जागेचा वेगवेगळया तारखेस ताबा घेतलेला आहे. ज्यावेळी ताबा घेवुन भुधारकास ताबा पावती दिली आहे त्यावेळीचे सिध्द शिघ्र गणाचे दरा प्रमाणे मुळ जागेची रक्कम रुपये 3,84,95,360/- होत असून त्या रक्कमेवर 30% दिलासा रक्कम तसेच दरसाल दर शेकडा 12% अतिरिक्त घटकाची रक्कम या व्यतिरिक्त बांधकाम मुल्यांकनाची रक्कम इत्यादी बाबी प्रमाणे जवळपास रु. 8.00 कोटी पेक्षा अधिक रक्कम वितरण होणे अपेक्षीत आहे.

या 176 भुधारका पैकी सद्यस्थितीत 10 भुधारकांनी मा. लोक आयुक्त महाराष्ट्र शासन यांच्याकडे माहे ऑगस्ट, सप्टेंबर 2016 चे कालावधीत तक्रार करुन संपादीत जागेचा मावेजाचा मागणी केली आहे. त्यामध्ये तेंव्हा पासून सतत मा. लोक आयुक्त महाराष्ट्र शासन यांचेकडे सुनावणी होवून मावेजा लवकरात लवकर वितरण करणे बाबत पाठपुरावा होत आहे.

त्याअनुषंगाने भुसंपादनातील जागेचा मावेजा या 10 भुधारकांना वितरणासाठी रक्कम रु. 80.00 लक्ष खर्च अपेक्षीत होणार आहे या व्यतिरिक्त बांधकाम मुल्यांकनाची रक्कम वेगळी आहे.

तेंव्हा देगलुर नाका चौक ते माळ टेकडी 30 मी. रुंद रस्त्याचे भुसंपादनासाठी सालसन 2017-18 चे अंदाजपत्रकात अपेक्षीत रु. 8.00 कोटी खर्चाची तरतुद करुन मनपा फंडातुन देणेसाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणेस्तव सदरचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं.14**

मा. आयुक्त तथा अभियान संचालक, आरोग्य अभियान मुंबई यांचे पत्र क्रं. रानाआअ/पदभरती/73690-719/ दिनांक 06.11.2017 च्या पत्राचे क,पया अवलोकन व्हावे.

तसेच मा. महापौर यांनी दि. 15.11.2017 रोजी घेतलेल्याबैठकीतील सुचना नुसार राष्ट्री शहरी आरोग्य अभियान (एनयएमएचएम) अंतर्गत कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्या सुधारीत मासीक वेतनानुसार शहरातील राहणीमान तसेच इतर आवश्यक बाबी व महापालिके अंतर्गत इतर संवर्गातील नियमीत आरोग्य अधिकारी / कर्मचारी यांच्या तुलनेत NUHM अंतर्गत देण्यात येणारे मानधन अत्यंत कमी असल्यामुळे या बाबत तफावत दुर करण्यात यावी असे बैठकीत निर्देश देण्यात आले या बाबत मिराभाईंदर महानगरपालिका यांनी NUHM अंतर्गत मंजुर मानधन व त्यावर मनपा स्तरावरुन अतिरिक्त मानधन प्रस्तावित करुन पदभरती करुन प्रक्रिया पुर्ण केलेली आहे. या धरतीवर मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांच्या सुचनेनुसार मनपा स्तरावरुन अतिरिक्त मानधन प्रस्तावित करुन नियमीत कर्मचारी घेत असलेले वेतन व कंत्राटी वेतनातील असलेला फरक कमी होईल तसेच कार्यरत NUHM अंतर्गत अधिकारी / कर्मचारी यांच्या कामाचा दर्जा सुधारण्यास मदत होईल.

त्या अनुषंगाने NUHM अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी / कर्मचारी व नव्याने नियुक्ती होणा-या NUHM अंतर्गत कंत्राटी अधिकारी / कर्मचारी यांच्या मानधन व मनपा स्तरावरुन प्रस्तावित अतिरिक्त मानधन मनपा फंडातुन देण्यात यावे करिता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठोक मासिक मानधन शासन मार्फत व मनपा मार्फत देय वेतन देयक तक्ता

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी यांचे नांव | अधिकारी / कर्मचारी यांची पदसंख्या | शासन मार्फत मानधन प्रतिमहा (अ) | मनपा स्तरावरील प्रस्तावीत अतिरिक्त मानधन प्रतिमहा (ब) | एकूण सुधारीत मानधन प्रतिमहा अ + ब = | शेरा कामाचे मुल्यमापन |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | अर्ध वेळ वैद्यकिय अधिकारी | 08 | 24,000/- | 21,000/- | 45,000/- | चांगले काम |
| 02 | शहर लेखा व्यवस्थापक | 01 | 22,680/- | 1,320/- | 24,000/- | चांगले काम |
| 03 | स्टाफ नर्स | 10 | 10,800/- | 5,200/- | 16,000/- | चांगले काम |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 04 | परिचारीका (एएनएम) | 35 | 8,314/- | 5,686/- | 14,000/- | चांगले काम |
| 05 | मिश्रक | 06 | 8,000/- | 6,000/- | 14,000/- | चांगले काम |
| 06 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 07 | 7,000/- | 5,000/- | 12,000/- | चांगले काम |
| 07 | लेखापाल | 01 | 10,500/- | 3,500/- | 14,000/- | चांगले काम |
| 08 | संगणक चाले तथा लेखापाल | 01 | 9,600/- | 4,400/- | 14,000/- | चांगले काम |

प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मान्यता मिळण्यास्तव सादर.

## विषय क्रं.15

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत क्षेत्र-B मधील मुख्य रस्त्यावरील चौकांचे डांबरीकरण करणेसाठी कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/साबांवि/11997/2017 दिनांक 08.11.2017 नुसार मान्यता झाल्या प्रमाणे अंदाजपत्रकीय किमंत रुपये 42,40,500/- साठी ई. टेंडर सेल व्दारे निविदा सुचना क्रं. साबांवि/12086/2017 दिनांक 09.11.2017 अन्वये दैनिक दिव्यमराठी (राज्यस्तरीय)/दैनिक एकमत या वर्तमानपत्रात दिनांक 10.11.2017 रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण 03 (तिन) निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दि. 04.12.2017 रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | ग्लोबल इन्टरप्रायजेस नांदेड | 12% जास्त दर |
| 02 | कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड | 15.55% जास्त दर |
| 03 | जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड | 0.53% कमी दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्ष 0.53% कमी दराची आहे.

करिता नांदेड वाघाळा शहरम हानगरपालिका हद्यीत क्षेत्र-B मधील मुख्य रस्त्यावरील चौकांचे डांबरीकरण करणेसाठी जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.53% कमी दराची निविदा मंजुरीस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रुपये 42,40,500/- साठी प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव व तुलनात्मक तक्त्यानुसार जी.जे. कन्स्ट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.53% कमी दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव कलम 35(अ) मधील तरतुदीनुसार मनपा सभेसमोर सादर.

मुख्य लेखाशिर्ष : रस्ते दुरुस्ती/नाली दुरुस्ती
एकूण तरतुद : रुपये 5,00,00,000/-
पुर्वी झालेला खर्च : रुपये 3,67,21,460/-
या कामावर होणारा खर्च : रुपये 42,40,500/-
शिल्लक रुपये : रुपये 58,39,836/-

## विषय क्र.16

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये समावेश झालेला आहे. त्यानुसार सदर योजने अंतर्गत लाभार्थीचे सर्व्हेक्षण करणे, सर्वांसाठी घरे कृती आराखडा तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून काम करणे इत्यादी कामासाठी सल्लागार नियुक्तीसाठी निविदा दि. 04.11.2017 रोजी स्थानिक पातळीवर व राज्य पातळीवर दै. गोदातीर समाचार व दै. पुण्यनगरी या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांकास एकूण 04 निविदाधारकांनी ऑनलाईन निविदा सादर केल्या.

सदर (04) निविदाधारकांचे तांत्रिक पात्रतेचे सर्व कागदपत्र तपासणी केली असता (01) निविदाधारक पात्र ठरले असल्याने त्यांचा आर्थीक देकाराचा लिफाफा ऑनलाईन उघडण्यात आला ज्यामध्ये खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | सर्वांसाठी कृती आराखडा व वार्षिक अमलबजावणी आराखडा तयार करणे (HFAPoA & AIP) | AHP DPR तयार करणे (खाजगी भागीदारी तत्वावर घरांची निर्मीती करणे) | BLC DPR तयार करणे (वैयक्तीक स्वरुपातील घरकुल बांधकाम करणे) | प्रकल्प व्यवस्थापन (PMC) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | नवनिर्माण महिला बहुउदेशिय संस्था अकोला | रुपये 15,00,000/- LUMSUM | 0.78% (प्रकल्प किमतीच्या) | 0.88% (प्रकल्प किमतीच्या) | 1.99% (प्रकल्प किमतीच्या) |

वरील प्रमाणे यांचे आर्थीक देकार प्राप्त झाले असुन हे दर जीएसटी सहीत आहेत. नवनिर्माण महिला बहुउदेशिय संस्था अकोला, सदर सल्लागारास दर कमी करणेच्या वाटाघाटीस पाचारण करण्यात आले. वाटाघाटीअंती सदर सल्लागाराने खालील प्रमाणे अंतिम दराने काम करणेची लेखी समंती दिली आहे.

1) सर्वांसाठी घरे कृती आराखडा व वार्षीक अमलबजावणी
आराखडा तयार करणे (HFAPoAIP & AIP) रु. 5,60,000/- (Lum/Sum)
2) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे (**DPR AHP**) रु. – 0.70% प्रकल्प किमंतीच्या
3) सविस्तर स्वमालकीचे घरकुले प्रकल्प अहवाल तयार करणे (BLC) रु. – 0.70% प्रकल्प किमंतीच्या
4) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) रु. – 0.70% प्रकल्प किमंतीच्या

वरील प्रमाणे डीपीआर तयार करणे 0.70% व पीएमसी यासाठी 0.70% असे एकूण 1.40% (प्रकलप किमंतीच्या) टक्केवारी नुसार सदर नवनिर्माण महिला बहुउदेशिय संस्था, अकोला , काम करण्यास तयार आहे सदर 1.40% दर हे जीएसटी करासहीत असुन योग्य आहेत.

करिता प्रधानमंत्री आवास योजनेची काम जलदगतीने परिणामकारकरित्या होण्यासाठी नवनिर्माण महिला बहुउदेशिय संस्था, अकोला यांच्याशी करारनामा करुन खालील दराने सल्लागार म्हणुन नियुक्ती करण्यासाठीचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

1) सर्वांसाठी घरे कृती आराखडा व वार्षीक अमलबजावणी
आराखडा तयार करणे (HFAPoAIP & AIP) रु. 5,60,000/- (Lum/Sum)
2) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे (**DPR AHP**) रु. – 0.70% प्रकल्प किमंतीच्या
3) सविस्तर स्वमालकीचे घरकुले प्रकल्प अहवाल तयार करणे (BLC) रु. – 0.70% प्रकल्प किमंतीच्या
4) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) रु. – 0.70% प्रकल्प किमंतीच्या

**विषय क्र.17**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत हैदरबाग युसीएचसी कार्यरत आहे. त्यामध्ये वैद्यकिय अधिक्षक म्हणून डॉ. अब्दुल राफे अब्दुल खदीर हे सदर पदाचे कामकाज पाहतात. तसेच श्री सुहास रघुनाथराव सोनुले (कार्यक्रम व्यवस्थापक) हे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान तसेच अर्बन आरसीएच कार्यकेमाची अमलबजावणी करतात. हैदरबाग येथील दवाखान्यात मा. महापौर श्रीमती शिला किशोर भवरे यांच्याअध्यक्षतेखाली दवाखान्याच्या कामकाजा संदर्भात दिनांक 15.11.2017 रोजी महत्वपुर्ण बैठकीत सुधारीत मानधना बाबत चर्चा करण्यात आली. एनयुएचएस अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांचे सध्या घेत असलेले मानधन व मनपा आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या सध्या घेत असलेले मासिक मानधनात ब-याच प्रमाणात तफावत आहे मनपा स्तरावरुन सुधारीत मानधन प्रस्तावित करुन नियमीत कर्मचारी घेत असलेले वेतन व कंत्राटी वेतनातील असलेला फरक कमी होईल तसेच कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांच्या कामाचा दर्जा सुधारण्यास मदत होईल.

त्यानुसार हैदरबाग युसीएचसीचे वेद्यकिय अधिक्षक व अर्बधन आरसीएच शहर कार्यक्रम व्यवस्थापक यांच्या सुधारीत मानधनवाढ ही मनपा निधीतुन देण्यात यावे करिता सदरचा प्रस्ताव महासभे समोर मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | नांव व पदनाम | नियुक्ती दिनांक | एकूण अनुभव | सध्या घेत असलेले मनपा स्तरावरील मानधन प्रतिमहा | प्रस्तावित मनपा स्तरावर मानधन वाढ प्रतिमहा | एकूण सुधारीत मानधन प्रतिमहा | कामाचा शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | डॉ. अब्दुल राफे अब्दुल खदीर (वैद्यकिय अधिक्षक | 03.12.2008 | 09 वर्षे | 4,000/- | 10,000/- | 50,000/- | EXCELLENT |
| 02 | श्री सुहान रघुनाथराव सोनुले (शहर कार्यक्रम व्यवस्थापक) | 17.07.2010 | 07 वर्षे | 18,000/- | 12,000/- | 30,000/- | EXCELLENT |

**विषय क्रं.18** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत ब्रम्हपुरी भागात बिएसयुपी योजने अंतर्गत कोणकोणत्या कंत्राटदारा मार्फत घरकुलांचे, पाण्याची पाईप लाईन, ड्रेनेज लाईन, दिव्या बत्ती, रोड व नालीचे बांधकाम कितीचे होते व किती करण्यात आले व किती शिल्लक आहे याची लेखी स्वरुपात महासभेत सादर करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक**:-अ. रशीद अ. गणी **अनुमोदक**:- शमीम बेगम शेख जावीद

**विषय क्रं.19** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत टेनिस अकॅडमी अंतर्गत या खळाचा प्रचार प्रसान व मार्गदर्शन शिबीर सुरु करण्यासाठी टेनिस कोर्ट स्वता:ने उभारुन नागरीकांना खालील पुढील प्रमाणे सुविधा देता येईल (1) 5 ते 6 अंतरराष्ट्रीय दर्जाचे टेनिस कोर्ट (2) 12 महिने तज्ञ मार्गदर्शका मार्फत मार्गदर्शन शिबीर (3) टेनिस प्रोत्साहनासाठी सेमीनार (4) राज्य व राष्ट्रीय स्तरावरचे सामने आयोजीत करणे (5) भावी खेळांळूसाठी पाणी व प्रसाधन गृहाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी

महानगरपालिका मालकीची श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम परिसर, इंदिरागांधी मैदान येथे जागा नांदेड टेनिस अकॅडमी नांदेड विष्णुनगर कॉम्पलेक्स आयटीआय जवळ नांदेड यांना उपलब्ध करुन नियमानुसार देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- गड्डम नागनाथ **अनुमोदक** :- दुष्यंत सोनाळे

**विषय क्रं.20** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत अनाधिकृत बांधकाम शास्तीवरील थकबाकी शास्ती माफ करणे बाबत.

**सुचक:**- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले, अ. रशीद अ. गणी **अनुमोदक:**- अ.शमीम अब्दुल्ला, अ.लतीफ अ. मजीद, नागेश कोकुलवार

**विषय क्रं.21** **प्रस्ताव**

मनपा हद्यीत प्रभाग क्रं. 11 हैदरबाग हा 99% अल्पसंख्यांक बहुल प्रभाग असुन या प्रभागाची लोकसंख्या जवळपास 29,000 एवढी आहे सदर प्रभाग अविकसित असून या प्रभागातील मिल्लतनगर, नमक कारखाना या भागात कसल्याही प्रकारची मुलभुत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे येथील नागरीकांना अत्यंत त्रास सोसावा लागत आहे.

करिता सदर भागात मुलभुत सुविधा ( रस्ते / नाल्या ) ची कामे करणेसाठी अल्पसंख्यांक भागाचा विकास करण्यासाठी शासनाकडून अल्पसंख्यांक निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- स. शेर अली महेबुब अली **अनुमोदक** :- रजिया बेगम बाबु खान

**विषय क्रं.22** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत वजिराबाद भागातील असलेल्या जैन मंदिराच्या समोरील रस्त्याला **श्री श्वेतांबर जैन मंदीर मार्ग (चौक)** हे नामकरण करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते.

**सुचक:**- सौ. कांताबाई मुथा **अनुमोदक:**- अमीतसिंह तेहरा, श्रीमती प्रभाबाई यादव, गुरमीतसिंघ नवाब

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| नावाशमनपा नांदेड | नावाशमनपा नांदेड |